3323

**तात्काळ**

जाक्र/जिपऔ/१-प्रशासन/२०१८
कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद
दिनांक - 1 जुलै २०१८

प्रति,

----------------------
----------------------
----------------------

**विषय- गट ड मधुन गट क पदावर नियुक्तीसाठी विकल्प सादर करणे बाबत.**

संदर्भ- मा.उच्च न्यायालय याचिका क्र. २३३/२०१२ मधील न्यायनिर्णय

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की,जिल्हा परिषद औरंगाबाद अंतर्गत अनुकंपातत्वावर गट-ड मध्ये नियुक्ती दिलेले परंतु नियुक्तीच्या वेळी गट-क पदाची अर्हता धारण करणा-या कर्मचा-यांना मा,उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद रिट पिटीशन क्र. २३३/२०१२ च्या निर्णयानुसार गट-क पदावर नियुक्ती देणे प्रस्तावित आहे. आपणास आपली शैक्षणीक अर्हता व आपले प्रवर्गातील रिक्त पदानुसार उपलब्ध होवु शकणा-या पदावर आपले कडुन विकल्प घेवून नियुक्ती देण्याचे विचाराधीन आहे.

तरी जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ आणि जि.प.चे नोटीस बोर्डवर प्रवर्गनिहाय आणि संवर्ग निहाय रिक्त असलेल्या पदाचे अहवालानुसार आपले शैक्षणीक अर्हतेनुसार आपणास मिळू शकणा-या पदाचा विकल्प या कार्यालयास सादर करावा. आपण विकल्प सादर केल्यानंतर सेवा जेष्ठतेच्या अधीन राहून विकल्पाची तपासणी करुन आपणास विकल्पा प्रमाणे उपलब्ध होवु शकणा-या पदावर नियुक्ती देण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल. मात्र विकल्प दिलेनंतरही विकल्पाच्या पलीकडे जावून या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या गट-क च्या पदावर आपणास नियुक्ती देण्याचे अंतिम अधिकार निवड समितीकडेच असतील याच्या जाणीवणीशी आपला विकल्प सादर करावा. सदर विकल्प सादर करण्यासाठी आपण दिनांक 17 /०७/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह जिल्हा परिषद औरंगाबाद येथे उपस्थित रहावे.

***(स्थळ प्रतिवर मा.मु.का.अ.यांची स्वाक्षरी असे)***

**स्वाक्षरीत/**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, औरंगाबाद,करीता**

**प्रतिलिपी-**

१. सर्व खाते प्रमुख ................................ जि.प.औरंगाबाद यांना देवुन कळविण्यात येते की, आपल्या अंतर्गत पात्रता धारण करणा-या कर्मचा-यास उपरोक्त नमुद केल्यानुसार अवगत करण्यात यावे.

२. सर्व गटविकास अधिकारी ........................ पं.स. ............. यांना देवुन कळविण्यात येते की, आपल्या अंतर्गत पात्रता धारण करणा-या कर्मचा-यास उपरोक्त नमुद केल्यानुसार अवगत करण्यात यावे.

**स्वाक्षरीत/**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, औरंगाबाद**